# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/ केस क्र.३२/ २०१७-१८/ 365 364 दिनांक : ०८-१२-२०१७

## आदेश केस क्र.३२/२०१७-१८

प्रति,
मेंसर्स स्टॅंडर्ड फ्लोरोमर्स प्रा.लि.
प्लॉट क्र.C-२३/११ औद्योगिक वसाहत
मिरज ता.मिरज जि. सांगली — **अर्जदार**

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली — **विरुध्द पक्षकार**

२) कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
शहर विभाग, सांगली

**कोरमः-** १.श्री ए.व्ही. देशपांडअध्यक्ष
२.श्री. पी.व्ही.. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

ए.व्ही. देशपांडे , अध्यक्ष, ग्राहक तक्रार निवारण मंच,कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय जाहीर करीत आहे.

१) प्रस्तुतचे अपिल अपिलकाराने, अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडल कार्यालय सांगली हयांचे दिनांक १५.०७.२०१७ चे आदेशा विरुध्द दाखल केले आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण



२) सदर आदेशाने, कक्षाने , अपिलकाराची नविन उच्च दाब विद्युत पुरवठा घेण्यासाठी झालेला रक्कम रु. १,९९,९९५/- इतका खर्च विरुध्द पक्षकारांकडून परत मिळण्याची मागणी फेटाळून लावली आहे.

३) तक्रारदाराचे म्हणणे थोडक्यात असे की, सदर तक्रारदार/अपिलकार, प्लॉट क्र. C-२७ एम.आय.डी.सी. मिरज येथे उच्चदाब वीज ग्राहक असून त्यांचा उच्चदाब ग्राहक क्र. ९००९९५० असा आहे. सदरच्या वीज पुरवठयाकरिता तक्रारदाराने Distribution Pole ते सदरचे मीटर पर्यन्त परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे विविध बाबी जसे मिटरींग क्यबीकल C.M.C. Pole ,Cables, Pin Insulators, Danger Boards , Lighting Arrester Cross Arms Pin Supports H.T. Earthing set, stay Plate त्या उभारणीची मजूरी ठेकेदाराचे शुल्क ,करीता, एकूण रक्कम रु. १,९९,९९५.०० इतका खर्च केला आहे. विज वितरण कंपनीच्या दि. २७.०९.२००६ च्या परिपत्रक क्र. ४३ प्रमाणे तसेच नागपूर येथील ग्राहक तक्रार निवारण मंच, नागपूर मंडल (ग्रा) नागपूर हयांचे Application/Case No.CGRF/NZ/Rural/२६१ of २०१० मधील दिनांक ०९.०६.२०११ च्या आदेशाप्रमाणे विज वितरण कंपनीनीवर नमूद केलेल्या बाबीवर खर्च करणे आवश्यक असून सदरचा खर्च विद्युत ग्राहकाकडून वसूल करता येत नाही, केला असल्यास ग्राहकास परत करावा अश्या सुचना/आदेश देण्यात आलेले आहेत. सबब तक्रारदारास वरील खर्चाची रक्कम देण्याचा आदेश व्हावा.

४) विरुध्द पक्षाचे कथन थोडक्यात असे की, तक्रारदारास देण्यात आलेला उच्चदाब वीज पुरवठा dedicated Distribution Facility (DDF) खाली देण्यांत आलेले असून दिनांक २९.०३.२०१६ रोजी लिहून दिलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये तक्रारदाराने सदराचा वीज पुरवठा घेण्याकरिता आलेल्या खर्चाचा परतावा मागणार नाही असे बंधपत्र लिहून दिलेले असून विज वितरण कंपनीच्या दि. १२.११.२०१७ चे परिपत्रकानुसार dedicated Distribution Facility (DDF) अंतर्गत वीज पुरवठा देण्यांत आलेल्या ग्राहकांना सर्विस लाईन आकार, आऊट राईट कॉन्ट्रब्युशन आकार व विज मीटरची किंमत लागु असणा-या व्याजासह परतावा देवू नये अश्या सुचना असल्यामुळे तक्रारदारांची मागणी मान्य करता येत नाही.

५) कक्षाने विरुध्द पक्षाचे वरील कथन मान्य करुन तक्रारदाराची/अपिलकाराची संपूर्ण मागणी फेटाळून लावली आहे.

६) प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी ग्राहक तक्रार निवारण मंच, महावितरण, परिमंडल कार्यालय, ताराबाई पार्क,कोल्हापूर येथे घेण्यात आली सुनावणीचे वेळी तक्रारदाराचे अधिकृत प्रतिनिधी श्री गणेश निकम हजर होते तर विरुध्द पक्षातर्फे कार्यकारी अभियंता श्री महावीर शेंडगे हजर होते.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण



७) त्यांचा युक्तिवाद अैकून घेण्यात आला. उभय पक्षकारातर्फे दाखल केलेली कागदपत्रे परिपत्रके, नागपूर येथील ग्राहक तक्रार निवारण मंचाने CGRF/NZ/Rural/२६१ of २०१० मध्ये दिलेल्या दि. ०९.०६.२०११ चा निकाला तसेच मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने केस क्र. ८२/२००६ दि. १७.०५.२००७ व दि. २१.०८.२००७रोजी पारीत केलेले आदेश आणि मा. सर्वोच्च न्यायालयाच्या सिव्हील अपिल क्र.४३०५/२००७ मधील दिनांक १०.११.२०१६ च्या निकालांचे अवलोकन केले.

८) आमच्या निष्कर्षा करिता खालील मुद्दे उपस्थित होतात

| | |
|---|---|
| मुद्दा क्र.१:- | तक्रारदारास ,मागीतल्या प्रमाणे परतावा मिळणे योग्य होते काय? |
| उत्तर: | नाही. |
| मुद्दा क्र.२:- | अंतर्गत कक्षाचा निर्णय योग्य आहे काय? |
| उत्तर:- | होय. |
| मुद्दा क्र.३:- | अंतिम आदेश. |
| उत्तर:- | खालील प्रमाणे. |

९) आमच्या वरील निष्कर्षाची कारणे खालील प्रमाणे आहेत.

## कारण मिमांसा

१०) मुद्दा क्र.१ ते ३ :- सदर प्रकरणातील संपूर्ण बाबी (Facts) हया उभय पक्षी मान्य असल्यामुळे त्यांचा उहापोह करणे आवश्यक नाही. तथापि ठळक बाबी त्या ठिकाणी नमूद करणे आवश्यक आहे. तक्रारदारास Dedicated Distribution Facility खाली सदरचा उच्चदाब वीज पुरवठा औद्योगिक वापराकरिता देण्यात आलेला आहे. ही बाब उभय पक्षी मान्य आहे. सदर वीज पुरवठा घेणेकरिता तक्रारदाराने, अर्ज परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद केल्याप्रमाणे त्या त्या बाबी करता रु. १,९९,९९५.०० इतका खर्च केला आहे. ती बाब देखील उभय पक्ष मान्य आहे. तसेच तो खर्च करतांना, सदरच्या खर्चाच्या परतावा मागणार नाही असे बंधपत्र दि. २९.०३.२०१६ रोजी लिहून दिलेले आहे ही बाब तक्रारदाराने अमान्य केलेली नाही वर नमूद केल्याप्रमाणे खालील कक्षाने सदर बंधपत्र व विज वितरण कंपनीच्या दि. १२.१०.२०१७च्या परिपत्रक क्र. मुअ(वितरण) डी-४/म.वि.वि.आयोग /२५०७९ च्या आधारे, तक्रारदारांची परताव्याची मागणी नाकारलेली आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण



११) तक्रारदारातर्फे महा.राज्य विज वितरण कंपनीच्या दि. २७.०९.२००७ च्या वाणिज्य परीपत्रक क्र. ४३ चा आधार घेण्यांत आलेला आहे. सदर परीपत्रकांचे कलम ६.१ मध्ये The commission has not permitted recovery of Service Line Charges from the prospective consumers. Except in cases of consumers requiring dedicated distribution facility. त्याच परिपत्रकातील कलम ६.२ The commission has directed that the cost towards infrastructure from the delivery point on the transmission system to distributing mains shall be borne by the company and therefore shall not be recovered from the consumers." आणि कलम ६०३ मध्ये " In view of the directives as above. The Service Line Charges shall not be recovered from the prospective consumers. अश्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. . सदरच्या सूचना, मा. महा.राज्य विद्युत नियामक आयोगाच्या केस क्र. ७०/२००५ मधील दि. ०८.०९.२००६ चे निकालानुसार विज वितरण कंपनीने काढलेल्या दिसतात. सदर आदेशाने मा. महा. राज्य विद्युत नियामक आयोगाने विज वितरण कंपनीने देऊ केलेल्या विविध सेवाकरिता ग्राहकांकडून वसूल करावयाच्या रक्कमांचे परिशिष्ट(Schedule of charges ) ठरवून दिल्याचे दिसते व त्या आदेशाने सर्व क्षेत्रीय अधिका-यांना दि. ०८.०९.२००६ पासून तत्कालीन किंवा त्या पूर्वी लागू असलेल्या दराप्रमाणे वसूली करण्यांचे आदेश सदर परिपत्रकाद्वारे विज वितरण कंपनीने दिलेले आहेत.

१२) मा. महा. राज्य विद्युत नियामक आयोगाच्या , केस क्र. ८२/२००६ मधील दि. १७.०५.२००७ व दि. २१.०८.२००७ हया दोन्ही आदेशाचे (ज्यांच्या प्रति तक्रारदाराने हया कामी हजर केल्या आहेत) अवलोकन करता असे दिसते की, महा. राज्य विज ग्राहक संघटनेने, सदरची तक्रार मा. आयोगा समोर विज वितरण कंपनीने, ग्राहकांकडून नविन वीज पुरवठा देतांना, मा. आयोगाच्या केस क्र. ७०/२००५ दि. ०८.०९.२००५ चा आदेश व महा. राज्य. विद्युत नियामक आयोग (विज पुरवठा विनियम व विज पुरवठयाच्या इतर शर्ती) विनियम २००५ च्या प्रावधाना विरुध्द , अवैधरित्या मिटरची किंमत व आऊट राईट कॉन्ट्रीब्युशन चार्जेस वसूल केल्यामुळे, ते चार्जेस ग्राहकांना परत करण्याचा आदेश मिळावा म्हणून दाखल केलेली होती. त्या प्रकरणांतील दि. १७.०५.२००७ व दि. २१.०८.२००७ च्या दोन्ही आदेशांचे बारकाईने अवलोकन करीत कोठेही असे आढळून येत नाही की, त्या प्रकरणांत किंवा आधीच्या केस क्र. ७०/२००५ मध्ये Dedicated Distribution Facility खालील विज ग्राहकांचा विचार त्यात झालेला होता. सदर प्रकरणी मा. आयोगाचा अंतिम निर्णय काय झाला हया बद्दल उभय पक्षकारांनी अनभिज्ञता दर्शविली. मा. सर्वोच्च न्यायालया समोर,विज वितरण कंपनीने मा. आयोगाच्या केस क्र. ८२/२००६ मधील आदेशा विरुध्द सिव्हील अपिल क्रमांक ४३०५/२००५ , दाखल केल्याचे दिसते व ते अपिल मा. सर्वोच्च न्यायालयानेदि. १०.११.२००६ रोजी खारीज केल्याचे ,त्या निकालाच्या प्रतिवरुन दिसते. सदर निकालामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने , अपिलकारातर्फे उपस्थित केलेल्या मुद्यांशी सहमत होता येत नाही. ज्या निकाला विरुध्द अपिल दाखल करण्यांत आले आहे. तो निकाल योग्य असून, त्यात हस्तक्षेप करण्याची आवश्यकता नाही सबब सदरचे अपिल फेटाळण्यात येत आहे. असा आदेश दिला आहे. त्यामुळे, मा. महा. राज्य विद्युत नियामक आयोगाने केस क्र. ८२/२००६ मधील दोन्ही आदेश किंवा मा. सर्वोच्य न्यायालयाचा उपरोक्त निर्णय त्या प्रकरणाला लागू पडत नाही असे आमचे नम्र मत (सदर निकांलाचा पूर्ण आदर राखून) आहे.

१३) तक्रारदारांतर्फे , नागपूर येथील ग्राहक तक्रार निवारण मंच, नागपूर परिमंडल(ग्रा)/नागपूर हयाच्या Case No.CGRF/NZ/Rural/२६१ of २०१० च्या दि. ०९.०६.२०११ च्या निकालाचा घेतलेला आधार, हा अनाठायी आहे. एकतर तो निकाल समकक्ष मंचाचा निकाल असल्याने, हया मंचावर बंधनकारक होऊ शकत नाही आणि दुसरे की त्याही प्रकरणांत Dedicated Distribution Facility असतानाचा ग्राहकांचा विचार झालेला नाही.

१४) ही बाब उल्लेखनीय आहे की, हया सर्व निकालानंतर सुध्दा अगदी नजिकच्या काळांत म्हणजे दि. १२.१०.२०१७ रोजी विज वितरण कंपनीने मा. आयोगाच्या केस क्र. ८२/२००६ मधील आदेश दि. १७.०५.२००६ दि. २१.०८.२००६ ,केस क्र. ७०२/२००५ मधील मा. आयोगाच्या दि. ०८.०९.२००६ चा आदेश व मा. सर्वोच्च न्यायालयाचा सिव्हील अपिल क्रमांक ४३०५/२००५ मधील दि. १०.११.२०१६ चा संदर्भ देत , सर्व्हीस लाईन आकार आऊट राईट कनेक्शन आकार, व वीज मीटरची किंमत ग्राहकाना लागु असतानाचा व्याजासह परत करावी अशा सुचना दिलेल्या आहेत. त्यात कलम ७ मध्ये ज्याचा विज ग्राहकांना समर्पित वितरण सुविधाद्वारे (Dedicate) Distribution facility) विज पुरवठा देण्यात आलेला आहे. त्यांना सर्व्हीस लाईन आकार, आऊट राईट कॉन्ट्रीब्युशयन आकार व वीज मिटरची किंमत त्यांचा परतावा करु नये अश्या स्पष्ट सुचना/आदेश देण्यात आलेले आहेत. ज्या अर्थी तक्रारदार समर्पित वितरण सुविधा (Dedicated Distribution Facility) खाली विद्युत पुरवठा घेणारा ग्राहक आहे. त्या आर्थी त्यास खर्चाचा परतावा मिळण्यास तो पात्र नाही. असा हया मंचाचा स्पष्ट निष्कर्ष आहे. सबब, तक्रारदारांची तक्रार,कक्षाने योग्यरित्या खारीज केलेली असून त्या आदेशात हस्तक्षेप करण्याची आवश्यकता नाही असे हया मंचाचे मंत आहे.

१५) वरील कारणांकरिता मुद्दा क्र.१ चेउत्तर नकारार्थी देत प्रस्तुतचे अपिल खरीज करावे लागेल असा हया मंचाचा निष्कर्ष आहे. सबब आम्ही खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) प्रस्तुतचे अपिल/तक्रार फेटाळण्यात येत आहे.

२) त्या निकाला विरुध्द तक्रारदारांस अपिल दाखल करावयाचे असल्यास हा निकाल प्राप्त झाले पासून ६० दिवसांत पुढील पत्यावर अपिल दाखल करावे.

३) मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा-कूर्ला-कॉम्प्लेक्स , बांद्रा(पूर्व) मुंबई येथे दाखल करावे

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| ( पी.एस. बुरांडे) | (पी. व्ही. खपली) | (ए.व्ही. देशपांडे) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. महावितरण

मी प्रसाद स. बुराडे ग्राहक सदस्य, वरील निर्णयाशी मी सहमत नाही. यांच्या आदेशा वेगळे मत देत आहे. तो या निकालाचा भाग समजण्यात यावा. **(पुढील पानावर वेगळे मत देण्यात आलेले आहे)**

(श्री प्र. स. बुरांडे)
ग्राहक सदस्य

तक्रारदार ग्राहक यानी महावितरण अंतर्गत तक्रार निवारण कक्ष सांगलीकडे आपणास उच्च दाब वीज पुरवठा मिळण्यासाठी केलेल्या एकूण खर्चापैकी जो खर्च विद्युत कायदा २००३ विद्युत आयोग न्याय निर्णयानुसार परत मिळावयास हवा अशी मागणी केली, ती त्यानी ना मंजूर केली म्हणून मा. कोल्हापूर मंचाकडे अ फॅार्म मध्ये अर्ज करुन ग्राहकाने हा प्रश्न येथे मांडून न्यायाची मागणी केली असून १,९९,९९५.०० रु परत मिळावेत अशी मागणी केली आहे.

या मंचाकडे याची सुनावणी दि. १४.११.२०१७ रोजी झाली महावितरणचे वतीने मा.महावीर शेंडगे, कार्यकारी अभियंता, मंडल कार्यालय सांगली हे उपस्थित होते.सदर केस दाखल झाल्यानंतर मा. मंचाकडून मुद्देनिहाय उत्तर महावितरणकडून मागितले होते पण त्यांच्याकडून कांहीच उत्तर प्राप्त झाले नाही.त्यामुळे मा. मंचास आणि ग्राहकास या संबंधी महावितरणचे काय म्हणणे आहे हे अगोदर समजले नाही.

वि.प.तर्फे आपली बाजू मांडताना ग्राहकास ही विज जोडणी ही DDF योजने अंतर्गत दिली आहे आणि ग्राहकाने जोडणीसाठी भरलेली रक्कम मी परत मागणार नाही असे प्रतिज्ञापत्र लिहून दिले आहे. त्यामुळे हे पैसे मागण्याचा त्यांना अधिकार नाही आणि महावितरणचा दि. १२.१०.२०१७ च्या परिपत्रक क्र. २५०७९ मध्ये DDF खाली परतावा देऊ नये असे म्हटले आहे असे कथन केले.

यावर ग्राहकाने मा. आयोग मा. उच्च न्यायालय मा. सर्वोच्च न्यायालय यांच्या काही निकालांचा तोंडी उल्लेख केला आणि मा. सर्वोच्च न्यायालय यानी दिलेल्या १०.११.२०१६ च्या निकालाची प्रत तसेच मा आयोगाचा निकाल केस क्र. ८२/२००६ दिनांक १७.०५.२००७ आणि यावरील महावितरणचे उत्तर ८२/२००६ दि. २१.०८.२००७ सादर केले या बरोबरच ग्राहकाने महावितरणचे आयोग केस क्र. ७०/२००५ दि. २६.०९.२००६ नुसारचे परिपत्रक क्र. ४३ विषय शेडयूल ऑफ चार्जेस आणि आपल्या मागणीस साहयभूत ठरणारा नागपूर मंचाचा निकाला अवलोकनार्थ जोडला आहे. ग्राहकांने या बरोबरच मला मिळालेला विद्युत पुरवठा हा DDF योजनेच्या नियमानुसार उपकेंद्रापासून स्वतंत्रपणे मिळाला नसल्याचे सांगितले.

सर्व कागदपत्रांचे वाचन करण्यात आले ग्राहक आणि महावितरणची पूर्ण बाजू ऐकून घेण्यात आली यावर खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) ग्राहकाची परतावा मागणी योग्य आहे का?

उत्तर:- होय

२) आदेश

उत्तर:- शेवटी नमूद केल्याप्रमाणे

## कारण मिमांसा

तक्रारदार ग्राहक या केसमध्ये ग्राहकाच्या जागेपर्यन्त विज वहन करुन घेण्यासाठी जो खर्च ग्राहकाला (अकारण) करावा लागला तोच परत मागत आहे. यामध्ये खांब + केबल+मीटर आणि हे सर्व उभे करण्यासाठी आलेला खर्च याचा समावेश असून त्याचा एकूण खर्च १,९९,९९५.०० असा आहे त्याच्या पावत्याच्या छायांकित प्रति ग्राहकाने हजर केल्या आहेत.

महावितरण अधिका-यांच्या कथनानुसार या ग्राहकाने DDF योजने खाली मुद्राकित पेपरवर प्रतिज्ञापत्रावर सही करुन खर्च परत मागणार नाही असे लिहून दिले आहे. म्हणून आम्ही पैसे परत करणार नाही थोडक्यात अस्त्विात असलेले नियम विद्युत कायदा २००३ मा.आयोगाचे विविध आदेश यापेक्षाही ग्राहकाने महावितरणच्या दबावाखाली लिहून दिलेला बंधपत्र अधिक महत्वाच आहे असे वि.प. ला वाटते. आमच्या मते हे योग्य नाही.कारण ग्राहकांस विज पुरवठा करताना DDF च्या नियमाचे पालन झालेले नाही असे आम्हास वाटते.

ग्राहकाच्या जागेपर्यन्त विज पुरवठा देणे हे महावितरणचे काम आहे. विज कायदा २००३ नुसार बंधनकारक आहे. ग्राहकाने दिलेले प्रतिज्ञापत्र हे विज जोडणी मिळण्यासाठी दिलेल्या कागदपत्राचा भाग म्हणून DDF बंधपत्रावर वर सही केली आहे. असे ग्राहकांने सांगितले ते आम्हास मान्य आहे.

मा महाराष्ट्र विद्युत आयोग मुंबई यांचे आदेश क्र. ५६/२००७ चे आदेशानुसार ग्राहकाने केलेली मागणी आम्हास योग्य वाटते. या आदेशामध्ये स्पष्ट म्हटलेले आहे. की, विद्युत कायदा २००३ चे कलम ४३ आणि एसओपी २००५ ला प्रमाणे विज पुरवठा देणे ही महावितरणची जबाबदारी असून त्यांनी तशी व्यवस्था करणे आवश्यक आहे .यासाठी ५६/२००७ या आदेशामध्ये **Dedicated Distribution facility** संबंधीचे अतिशय स्पष्टपणे आपले मत नोंदविले आहे ते खालील प्रमाणे

At Many places prospective consumers with an intention to get better quality of supply seek Dedicated Distribution Facility, though distribution network is available in nearby vicinity and it is possible to give supply by extending the existing network. Such consumers seeking Dedicated Distribution Facility will have to pay the cost incurred in providing the Dedicated Distribution Facility . As per Regulation २(g) of the Supply Code.

(g) **Dedicated distribution facilities** means such facilities, not including a service line. Forming part of the distribution system of the Distribution Licensee which are clearly and solely dedicated to the supply of electricity to a single consumer or a group of consumers on the same premises or contiguous premises,

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. KOLHAPUR ZONE
महावितरण

GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

**It is clear from this defined term that mere extension or tapping of the existing line (L.T.or HT) cannot be treated as Dedicated Distribution Facility**. Such extension or tapping being part of the common network will be affected due to any fault or outages on the common network and cannot be considered as a facility solely or clearly dedicated for giving supply .Thus, in the distribution system. **Dedicated Distribution Facility means a separate distribution feeder or line emanating from a transformer or a substation or a switching station laid exclusively for giving supply to a consumer or a group of consumers**. The Transformer or the substation can also form a part of Dedicated Distribution Facility if it is provided exclusively for giving supply to these consumers and no other consumer is fed from the said transformer/substation Also, Dedicated Distribution Facility cannot be shared in future by other consumers. Such facilities cannot be imposed on a consumer. If the consumer does not seek Dedicated Distribution Facility, the licensee has to develop its own infrastructure to give electric supply within the period stipulated in Section ४३ of the EA २००३ read with the Maharashtra Electricity Regulatory Commission (Standards of Performance of Distribution Licensees Period for Giving supply and Determination of Compensation) Regulations, २००५. In fact, the licensee should take advance action to develop the distribution network, based on the survey of growth pockets and demand projections so as to fulfill Universal Service Obligation as per the spirit envisaged in the EA २००३ and the Regulations made there under.

It is also necessary to point out certain specific portions of the supply code Regulations dealing with Dedicated Distribution Facilities, as under.

३.३.५ Where the Distribution Licensee has recovered the expenses referred to in Regulation ३.३.३ above at any time after the notification of these Regulations, the consumer shall be entitled to the depreciated value of such dedicated distribution facilities, upon termination of the agreement or permanent discontinuance of supply in accordance with these Regulations

Provided that where such facilities have been provided by the consumer, then such facilities may be retained by the consumer upon termination of the agreement or permanent discontinuance of supply in accordance with these Regulations .

Provided however that where the discontinuance of supply is on account of the consumer s failure to pay any sum under Section५६ of the Act, the Distribution Licensee. In addition to the rights available under that Section shall be entitled to adjust such sums due from the depreciated value of facilities to which the consumer is entitled under this Regulation ३.३.५ or to retain facilities of such depreciated value as to cover such sums due from such consumers to the Distribution Licensee.

तसेच मा.आयोगाचे केस क्र.७०/२००५ चे आदेशास अनुसरुन महावितरण Ref:- PR३/cos/३४५८७ दि.२७-९-२००६ ला Shedule of charges संबंधी कमिर्शियल परिपत्रक ४३ जारी केले आहे यांचा आधार ग्राहकांने घेतला आहे.यामध्ये कलम ५ Cost of Meter and Meter Box ५.१ आणि ५.२ असे सांगतात की, ५.१ The company recover any cost towards meter and in case of lost and burnt meter, the company is permitted to cost as per Annexure-३. ५.२ The field officers shall note that the cost of the meter is recoverable only when a consumer elects to purchase the meter from the company or in case of lost and burnt meter. The recoverable charges approved by the Commission shall be as per Annexure ३. तसेच service line charges ६.१ मध्ये मा.विद्युत आयोगाने DDF सोडून कोणाकडूनही

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. KOLHAPUR ZONE महावितरण

सर्व्हीस लाईनचे चार्जेस घेऊ नये. असे म्हटले आहे. सदर ग्राहक आमच्या मते DDF नाही. त्यामुळे तो सर्व्हीस लाईन चार्जेस मिळण्यास पात्र आहे. ६.२ या आणि परिशिष्ट ३ चा विचार करता ग्राहकास मिटरचे आणि सर्व्हीस लाईनचेचा खर्च आणि इतर सर्व पैसे परत मिळणे आवश्यक आहे. असे आम्हास वाटते.

महा.विज नियामक आयोग केस क्र. ५६/२००७ केस क्र. ७०/२००५ नुसार महावितरणचे परिपत्रक क्र.४३ शेडयूल ऑफ चार्जेस हे दोन्ही ही सदर ग्राहक स्टॅंडर्ड फलोरोमर्स याना लागू होतात असे आमचे स्पष्ट मत आहे. कारण ग्राहकास केलेला विद्युत पुरवठा हा DDF सुविधेप्रमाणे ठरत नाही.

DDF वर ग्राहकाने केवळ सही केली म्हणून त्याने पैसे परत मागू नये यास कोणतीही कायदेशीरता नाही. यासाठी Indian contract Act १८७२ चे कलम २३ चा उल्लेख मा. बॅाम्बे हायकोर्ट रीटपिटिशन क्र,२७९८/२०१५ .महावितरण लि. विरुध्द एम.आर. सियॅान अॅग्रो प्रो. प्रा.लि. या निकालामध्ये केलेला आहे. तो खालील प्रमाणे.

The inequality becomes relevant when such agreements as the MOU in the present case are required to be considered by the Court. The applicability of doctrine of inequality to such contracts cannot be ignored .It is in this circumstance that the orders passed by the MERC and the statutory regulations play an pivotal role for protection of the consumers interest. Thus in entering into such agreements the petitioners in their public character cannot be oblivious of the statutory regulations and the obligations cast on them under the various orders, which are passed by the authorities under the Act and which become binding on the petitioners as in the present case. Nor can the petitioners enter into such agreements which would defeat the regulations or render nugatory the orders passed by the adjudicating authorities under the Act. Thus, the reliance of the petitioners on the decision of the Supreme Court in Virgo Steel Bombay (supra) would not assist the petitioners and/or is misplaced in the facts of the present case.

१०. In the circumstances, in my clear opinion, as the agreement itself being contrary to the requirement of law. The submission of estoppels or for that matter waiver of a legal right by respondent No. १., as urged on behalf of the petitioners cannot be accepted .It would be an argument contrary to be doctrine of public policy as envisaged under Section २३ of the Indian Contract Act.यांच्या आधारे आम्हास ग्राहकाने लिहून दिलेले बंधपत्र त्याचवर बंधनकारक नाही असे वाटते.

या केस संबंधी वरील सर्व निकालाचा विचार करता ग्राहकाची मागणी योग्य आहे असे आमचे स्पष्ट मत आहे. ग्राहकाने मागणी केलेले १,९९,९९५.०० रुपये त्यास वीज पुरवठा केलेल्या तारखेपासून व्याजासह परत मिळावे असे आमचे मत आहे.

**आदेश**

ग्राहकाची मागणी द.सा.द.शे १२ टक्के व्याजासह मंजूर करणेत येत आहे.

**दिनांक : ०८.१२.२०१७**

**( प्रसाद बुरांडे )**
**सदस्य ग्राहक तक्रार निवारण मंच कोल्हापूर**